**प्रेसनोट** तारीख ०७/०६/२०१८

स्वारगेट पोलीस ठाणेचे सर्व्हेलन्स पथकाचे पोलीस नाईक २८४२ हर्षल दुडम यांना त्यांचे बातमीदाराने कळविले की, स्वारगेट पोलीस ठाणे कडील सराईत गुन्हेगार तुकाराम सुधाकर काते रा. ४२९/३०, डायस प्लॉट, गुलटेकडी, पुणे हा गोल्डन बेकरीजवळ, सॅलिसबरी पार्क येथे आला आहे असे सांगितलेने पोलीस नाईक दुडम यांनी सदरची माहिती मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री भोसले सो यांना सांगितले असता त्यांनी सदरबाबत सर्व्हेलन्स पथकाचे पोलीस उप-निरीक्षक अे.के.चाऊस, पोलीस नाईक हर्षल दुडम व पोलीस शिपाई ७७४० दिपक मोधे यांना योग्य मार्गदर्शन करून सदरचा आरोपी ताब्यात घेणेसाठी रवाना केले असता सदर आरोपीला पोलीस उप-निरीक्षक चाऊस, पोलीस नाईक दुडम व पोलीस शिपाई मोधे यांनी बातमीदाराने सांगितलेल्या ठिकाणी सापळा रचून आरोपी याला पकडले व त्यास स्वारगेट पोलीस ठाणे येथे आणले असता सराईत गुन्हेगार तुकाराम सुधाकर काते वय २६ रा. ४२९/३०, डायस प्लॉट, गुलटेकडी, पुणे हा स्वारगेट गुन्हा रजि. नं. २८९/२०१६ भादविक १४३,१४७,१४८,१४९,३२४,४२७, महा.पो.ॲक्ट ३७(१),सह १३५ तसेच स्वारगेट पोलीस ठाणे गुन्हा.रजि.नं. ४३०/२०१७ भादविक ३९५,३९७,महा.पो.ॲक्ट३७(१)सह१३५ या गुन्हयात पाहिजे आरोपी होता. तसेच समर्थ पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ०७/२०१५ भादविक ४५४,४५७,३८० गुन्हयात फरारी होता. सदरबाबत अधिकतपास चालु आहे.

सदरची कारवाई मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री चंद्रकांत भोसले, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री मच्छिंद्र पंडीत यांचे मार्गदर्शनाखाली सर्व्हेलन्स पथकाचे अधिकारी पोलीस उप-निरीक्षक चाऊस, पोलीस नाईक दुडम, पोलीस शिपाई मोधे यांनी केलेली आहे.